**महाराष्ट्र शासन**
**प्रभारी व्यवस्थापक, वरळी दुग्धशाळा यांचेकार्यालय,**
**आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, प्रशासकीय इमारत, वरळी, मुंबई-४०००१८**
**दुरध्वनी -०२२-२४९३०२२० फॅक्स ०२२-२४९१९४७२**
**ईमेल-dmworlidairy६०@mail.com**

सं.क्र. प्रव्य/वदुशा/दु.प्रा. व वि.अ-२/ आरे केंद्रावर मदतनीस /२०२५-२६/ ९०३ दिनांक. १२/०१/२०२६ 13 JAN 2026

प्रति,
सर्व आरे दुध केंद्रचालक / संस्था,
वरळी / आरे / कुर्ला

विषय:- आरे केंद्र धारकास आरे केंद्रावर मदतनीस (सेल्समॅन) ठेवण्यास परवानगी मिळणेबावत.
संदर्भ:- १. महाराष्ट्र दुध वितरक सेना यांचे पत्र दि. १७.०६.२०२४
२. बृहन्मुंबई दुध योजना केंद्रचालक वेल्फेअर असोसिएशन यांचे दि. ३०.१२.२०२४ चे पत्र
३. मा. आमदार कालीदास कोळंबकर यांचे दि. १३.०१.२०२५ चे पत्र

उपरोक्त् संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सुचित करण्यात येते की, बृहन्मुंबई दुध योजनेअंतर्गत सदयस्थितीत आरे / वरळी / कुर्ला येथील आरे स्टॉल कार्यरत असुन सदरील वाटप करण्यात आलेले आरे स्टॉल एक्स् डेअरी तत्वावरील, एनर्जी, झेड व आरे दुध सरिता केंद्रचालक हे मागील ४० ते ४५ वर्षापासुन केंद्र चालवित असुन शासन पत्र दि. २९.०७.२०२२ नुसार ज्या केंद्र धारकांना केंद्र वाटप करण्यात आलेले होते त्याच व्यक्तीने केंद्र चालवावे असा नियम प्रचलित आहे. तसेच सुधारणा करण्यात आलेल्या नियमावलीतील शासन पत्र दि. २६.०४.२०२३ व २६.०५.२०२३ मध्येही मदतनीस ठेवण्याबावत मान्यता प्राप्त् नाही अथवा नमुद नाही.

तथापि, उपरोक्त् संदर्भ क्र. १, २, व ३ नुसार मा. मंत्री महोदय, दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य् यांचे अधिपत्याखाली आयोजित बैठक दि. २८.०१.२०२५ मधील चर्चेदरम्यान व प्राप्त् इतिवृत दि. २१.०३.२०२५ मधील प्राप्त निर्देशानुसार आरे स्टॉलधारक हे मागील ४० ते ४५ वर्षापासुन केंद्र चालवित असुन नियत वयोमानानुसार ज्येष्ठ् नागरिक (वयस्कर) झालेले असुन त्याच्यात निर्माण झालेले विविध दुर्धर आजार, दुर्बलता, असक्षमता इत्यादी बाबीचा विचारविनिमय होवुन आरे स्टॉलवर मदतनीस ठेवणेबाबत ज्या स्टॉलधारकांची मागणी आहे तशाची खातरजमा करुन त्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्यानुसार परंतु सदर स्टॉल हा मदतनीसाला वर्ग / हस्तांतरण करता येणार नाही किंवा कोणताही आर्थिक व्यवहार करता येणार नाही या सुचनेस बांधील राहुन खालील अटी व शर्तीस अनुसरुन मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१. ज्या स्टॉलधारकाच्या नावे आरे स्टॉल आहे त्यांचा मदतनीस ठेवणेबाबतचा अर्ज व कारणे.
२. स्टॉलधारकाचे आधारकार्ड, पॅनकार्ड व चालविण्यास सक्षम नसल्याबाबतचे ठोस पुरावे उदा. वयस्कर / दुर्धर आजार / शारीरीक दुर्बलता इत्यादी (या करिता जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे मुळ प्रमाणपत्र अनिवार्य) राहील.
३. ५००/- रुपयाचे बॉन्ड् पेपरवर विहीत नमुन्यातील रजिस्ट्रर्ड शपथपत्र दाखल करणे आवश्यक राहील (कोणताही व्यवहार नसुन केवळ मदतनीस नियुक्ती बद्दल) असुन कमीतकमी एक वर्ष बदल करता येणार नाही तद्नंतर बदल झाल्यास पुर्ववत तात्काळ या कार्यालयास कळविण्यात येवुन संपुर्ण प्रक्रिया पुर्ण करण्यात यावी.
४. तसेच मदतनीस यांचे महाराष्ट्र राज्य् अथवा मुंबई शहरातील आधारकार्ड (रहीवासी पुरावा), व इतर सक्षम पुरावे.
५. स्टॉलधारकाचे मुळ आदेश, करारनामा व बँक गॅरटी भुईभाडे भरणा केल्याची पावती इत्यादी जमा करणे अनिवार्य असेल.
६. स्टॉलधारकांने स्व्त: उपस्थित राहुन मदतनीससह पुरावा देणे आवश्यक आहे.
७. मदतनीसाची खात्री करुन परवानगी देण्याचे संपुर्ण अधिकार महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दुध योजना, वरळी यांना राहतील.
८. सदर मदतनीसासाठी करण्यात येणारी नियुक्ती हि अत्यंत तात्पुरत्या स्वरूपाची असेल व त्यामध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार हे महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दुध योजना, वरळी यांना राहतील.
९. सदरील मदतनीस यासाठी परवानगी दिलेला आरे स्टॉल हा अधिकृत केंद्रचालक यांचे पुरताच मर्यादित राहील त्यामध्ये बदल झाल्यास सदर मदतनीस परवानगी अपोआप संपुष्टात येईल.

वरील अटी व शर्तीस बांधील राहुन परवानगी देण्यात येईल त्या व्यतिरिक्त जे आरे केंद्रधारक परवानगी न घेता त्रथस्य् व्यक्ती ठेवुन चालवित असल्याचे आढळुन आल्यास अशा आरे केंद्रचालकांवर कार्यवाही करण्यात येईल व असे आरे स्टॉल शासन ताब्यात घेण्यात येतील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

महाव्यवस्थापक,
बृहन्मुंबई दुध योजना, वरळी

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी

१. प्रभारी व्यवस्थापक, वरळी, कुर्ला, आरे

प्रत,

१. महाराष्ट्र दुध वितरक सेना
२. बृहन्मुंबई दुध योजना केंद्रचालक वेल्फेअर असोसिएशन
३. मा. आमदार कालीदास कोळंबकर

महाराष्ट्र शासन
प्रभारी व्यवस्थापक, वरळी दुग्धशाळा यांचेकार्यालय,
आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, प्रशासकीय इमारत, वरळी, मुंबई-४०००१८
दुरध्वनी -०२२-२४९३०२२० फॅक्स ०२२-२४९१९४७२
ईमेल-dmworlidairy६०@mail.com

सं.क्र. प्रव्य/वदुशा/दु.प्रा. व वि.अ-२/केंद्र मदतनीस/२०२५- २६/ दिनांक

आरे दुध केंद्रावर मदतनीस ठेवण्यासाठी विहित नमुन्यात भरुन देणे बाबतचा अर्ज नमुना खालील प्रमाणे

| अ.क्र. | तपशिल | तपशिलाची संपुर्ण माहिती |
|---|---|---|
| १ | आरे केंद्र धारकांचे नाव व पत्ता | |
| २ | केंद्राचा क्रमांक | |
| ३ | केंद्राचे मुळ आदेश | |
| ४ | केंद्राचे भुईभाडे भरणा केलेली पावती | |
| ५ | अदयावत बँक गॅरन्टी व करारनामा | |
| ६ | केंद्र धारकांचे KYC संबंधित संपुर्ण कागदपत्रे | |
| ७ | मदतनीस ठेवण्याबाबतची सक्षम कारणे व पुरावे | |
| ८ | मदतनीसाचे नाव | |
| ९ | मदतनीसाचे परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे ओळखीचा पुरावा व इतर नमुद कागदपत्रे | |
| १० | परिपत्रकानुसार रु. ५००/- च्या बॉन्ड् पेपरवर रजिस्ट्रर्ड शपथपत्र | |

मदतनीसांची स्वाक्षरी केंद्रधारकांची स्वाक्षरी

टिप :- आरे केंद्रधारक हा सदयस्थितीत हयात आहे अथवा नाही याचा सबळ पुरावा यासह सादर करणे बंधनकारक राहील.